# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०३/२०१७

## १) रेल्वे विदयुत पोल वर लावलेले कॉपर वायर चोरुन नेल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २२/०३/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी समिरकुमार विजय मोदक वय ५८ वर्ष, रा. रेल्वे स्टेशन तुमसर रोड जि. भंडारा हे आपले स्टॉपसह ऑर्डनस फॅक्ट्री ते भंडाराचे रेल्वे लाईन विदयुत तारासंबधी पायी पेट्रोलींग करित असता बेला गावाजवळील रेल्वे दियुत पोलवर लावलेले कॉपर वायर १३ किलो किंमती ३०००/रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याचे दिसुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## २) रेतीची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २३/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली क्र. एमएच ३६/५१११ मध्ये बिनापरवाना चोरीची २ ब्रास रेती किंमती २५००/रू. चा माल चोरून नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि दांदडे पोस्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

## ३) शासकीय कामात अडथळा निर्मान केल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २३/०३/२०१७ चे १२.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले एसबीआय बॅक मोहाडी येथे शासकीय काम करित असता यातील आरोपीने बॅकमधील कॅबीन मध्ये जावुन फिर्यादीस तुने माझा बिजनेस लोन लवकर मंजुर करून दया असे चिडुन बोलुन त्यांचे टेबलवर हाथ आपटुन फिर्यादीचा हाथ पकडुन मारण्यास हाथ उचलला व फिर्यादीचे शासकीय कामात अडथळा निर्मान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५२,३५३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

## ४)संगनमत करून मारहान व शासकीय कामात अडथळा निर्मान केल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २३/०३/२०१७ चे १८.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनिक वय ५५ वर्ष, रा. तहसिल कार्यालय पवनी हे त्यांचे शासकीय कार्यालयात सरकारी कर्तव्यावर हजर असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून कार्यालयीन वेळेनंतर फिर्यादीचे कार्यालयात येवुन फिर्यादीने अटकाव करून ठेवलेला ट्रक का सोडत नाही या कारणावरून फिर्यादीस प्रतीबंध करून शिवीगाळ करून हाथाबुक्यांनी मारहान केले व शासकीय कामात अडथळा निर्मान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३४१,३३२,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) ट्रक चालकाने अफराफर केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक ३/०३/२०१७ चे १८.३० वा. ते ०६/०३/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा ट्रक क्र. एमएच ३६/१६५० चा मालक असुने त्या ट्रकवर असलेल्या आरोपी चालकाने फिर्यादीचा ट्रक किंमती १,५०,०००/रू. चा अफरातफर करून गहाळ केल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.